विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
फोन:- ०७२४-२२५६००१
ई-मेल:-hdahdspdkv@gmail.com

जा.क्र.वि.प्र/पसंदुशा/ठेका/दरपत्रक/ ३४८ /२०२५ दिनांक :१०/०७/२०२५

## दरपत्रक सुचना

**विषय : पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे तसेच वैरण विभागातील विविध कामे ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेकरिता दर पुरविणेबाबत … …**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता इ. कामे तसेच वैरण विभागातील विविध कामे ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेकरिता खालील शर्ती व अटींच्या अधीन राहून दर मागविण्यात येत असून सविस्तर दर भरणेकरीता दर पत्रक सोबत जोडले आहे.

### दरपत्रकाविषयी नियम, अटी व शर्ती

०१. इच्छुक दरपत्रक सादरकर्त्यांनी विभागातील विविध प्रकारचे कंत्राटी/ठेका पद्धतीने कामे करण्याचे दर हे प्रति महिना प्रमाणे सोबत जोडलेल्या दरपत्रकामध्ये भरून दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात सादर करावे. दरपत्रक *विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे सादर करावे* व लिफाफ्यावर **"विभागातील विविध कामे ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेबाबतचे दरपत्रक"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

०२. दरपत्रक सादरकर्त्याने खालील कागदपत्रे स्वसाक्षांकित करून दरपत्रकासोबत सीलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकात नमूद केलेले दर स्पष्ट व स्वच्छ दिसतील याप्रमाणे भरून सही व शिक्क्यासाहित सादर करावे.

अ) कंत्राटी मजूर पुरविण्याचा अद्ययावत परवान्याची सत्यप्रत.
ब) कंत्राटाच्या आस्थापनेचे (कंपनी/संस्था) PAN/TAN कार्ड व दरपत्रकावर स्वाक्षरी करणा-याचे आधार कार्डची छायांकित सत्यप्रत.
क) दरपत्रक सादरकर्त्याने कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या/महामंडळाच्या काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र सादर करावे.
ड) भविष्य निर्वाह निधी (EPF), व्यवसाय कर (P.T.), ई.एस.आय.सी.(Employees State Insurance Scheme), जी.एस.टी. (GST) इत्यादींच्या नोंदणी प्रमाणपत्रांच्या स्वस्वाक्षरीत सत्यप्रती.
इ) दरपत्रकात नमूद केलेल्या सर्व नियम, अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र दरपत्रकधारकाने सादर करावे.

०३. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख दि. २१.०७.२०२५ असून प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी सा. ५.४५ वाजता मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समिती समक्ष उघडण्यात येतील.

०४. इच्छुक दरपत्रक सादरकर्त्यांनी आपले दरपत्रक सादर करतांना वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय नियम, परिपत्रक, अधिसूचना इत्यादी व विद्यापीठाच्या अधिसूचना/परिपत्रक यांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच मूळ किमान वेतन, रहाणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करून दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

०५. दरपत्रक सादरकर्त्याने दरपत्रकात दिलेले दर स्पष्ट व सुवाच्य दिसतील याप्रमाणे अंकी व अक्षरी भरून सही व शिक्यासहित भरावेत. खोडाखोड असलेले, पांढरी शाई लावलेले अथवा इतर कोणत्याही कारणास्तव दरपत्रक खराब झालेले असल्यास सदर दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

०६. दरपत्रकातील दर हे शासनाच्या सर्व करांसहित असावेत. नमूद केलेले कंत्राटी कामाचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील बारा महिण्याकरिता ग्राह्य राहतील. बालमजूर कायद्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

०७. कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटी कामगाराला देय असलेले मजुरीचे वेतन हे मा. कामगार आयुक्त, मुंबई, (म.रा.) यांचे मजुरांसाठीच्या किमान वेतन अधिनियम, १९४८ शासन नियमानुसार नमूद करावे तसेच त्यानुसारच कंत्राटी मजुरांचे देय असलेले सर्व लाभ देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची राहील.

०८. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराचे वेतन रोखीने अदा न करता "Account Payee Cross Cheque" द्वारे अदा करणे किंवा बँकेत खाते उघडून त्यांचे मासिक वेतन त्यांचे बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.

०९. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा, विमा योजना, ई.एस.आय.सी., ग्र्याजुटी, बोनस, इत्यादी देयक बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. पुरविण्यात येणाऱ्या मजुरांचा विमा योजना खाते, ई.एस.आय.सी.खाते, बँक खाते इत्यादी काढण्याची कायदेशीर जबाबदारी संबंधित कंत्राटदाराचीच राहील. या बाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

१०. कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मजुरांचा नियमानुसार सामुहिक विमा कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील.

११. कंत्राटी मजुरांना शासनाच्या किमान वेतन व वेतन प्रदान नियमातील विहित दरानुसार विहित वेळेत कंत्राटदाराने/ठेकेदाराने कंत्राटी मजुरांना वेतन द्यावे. शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार देय/वेतन तसेच कामगार कल्याण निधी, ई.एस.आय.सी., पी.एफ. इत्यादींची कामगारांना व त्यांचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चालाने प्रत्येक महिन्याच्या देय्यकासोबत कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१२. कंत्राटदाराने मजुरास/कामगारास दरमहा अदा केलेल्या भविष्य निर्वाह निधी, गटविमा पावती वेतनचिठ्ठी दरमाह संबंधीत कार्यालयास देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्यांचे पुढील महिन्याचे देय्यक अदा करण्यात येणार नाही.

१३. कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सबकॉट्रक्टर/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल. उपरोक्त कारणामुळे काही कायदेशीर बाबी उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील व त्याचा या विभागाशी/विद्यापीठाशी काहीही संबंध राहणार नाही.

१४. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधीची कुठलीही जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही.

१५. कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. वीज, उन, पाऊस, भूकंप, मशिनरी अपघात, प्राणी/साप आणि वादळामुळे इजा/अपघात/मृत्यु संभवल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यांचा या कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१६. दुग्धशाळेतील कामे दैनंदिन स्वरुपाची असून दरपत्रकामधील नमूद कामांकरिता लागणारे पुरुष मजुर दररोज पुरविणे आवश्यक राहील व शासकीय नियमानुसार दैनंदिन आठ तासाचे काम राहील (सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.००). सदर कामे जनावरांशी संबंधित असून दिलेल्या कामामध्ये बदल होऊ शकतो. त्यामुळे वेळेवर सांगितलेली कामे करावी लागतील. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल.

१७. दुधाळ जनावरांचे दुध काढण्याची वेळ सकाळी ५.३० ते ७.०० व सायंकाळी ४ ते ५.३० राहील. कंत्राटधारकाने दुध काढण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तींनाच दुध काढण्याकरिता पाठविणे बंधनकारक राहील. सदर वेळेत न चुकता दररोज पुरुष मजूर पुरविणे आवश्यक राहील. दुध काढणा-या मजुरांना दुध काढणेसोबत दुधाळ जनावरांचे चारा-पाणी करणे, पंशुखाद्य टाकणे, दुधाळ जनावरांचा गोठा धुणे, जनावरे धुणे, गव्हाणी साफ करणे, गरज भासल्यास भरडा मशीनवर भरडा काढणे, दुधाळ जनावरांचे औषधोपचार करण्यास मदत करणे उदा. गाय बांधणे, गाईला औषध पाजणे, व्यालेल्या गाईची काळजी घेणे, लहान वासरांना दुध पाजणे ई. कामे तसेच वरिष्ठांनी वेळेवर सांगितलेली कामे करावी लागतील.

१८. प्रत्येक कंत्राटी मजुरांना contract act मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

१९. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंदवह्या ठेवणे व ते संबंधीत अधिका-याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

२०. कंत्राटी मजुरांचे हजेरीपत्रक प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी ठेवणे आवश्यक राहील. तसेच विभागप्रमुख यांना केव्हाही हजेरी पत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमध्ये मजूर कामावर न आढळल्यास त्याची गैरहजेरी मांडण्यात येईल.

२१. सदर कंत्राटी मजूर पुरविणारे कंत्राटदार/संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. दुग्धशाळेमध्ये काम केल्याचा अनुभव असलेल्या कंत्राटधारकास प्राधान्य देण्यात येईल.

२२. कंत्राटी कामावर लागतांना कंत्राटी काम करणा-या मजुरांचे दोन फोटो, आधार कार्ड, व्यक्तिश: संपूर्ण माहिती, पत्ता व दोन ओळखीच्या व्यक्तींचे नावे ई. माहिती विभागास सादर करावी लागेल.

२३. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तींची व्यवस्था कंत्राटदारास/ठेकेदारास करावी लागेल.

२४. कामावरील एखादया कंत्राटी मजुराचे काम असमाधानकारक वाटल्यास त्याचे जागी तात्काळ दुसरा कंत्राटी मजूर बदलून द्यावा लागेल.

२५. दरपत्रकामध्ये नमूद कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मजुरांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील. कोणत्याही हानीची सदर कार्यालय भरपाई करून देणार नाही.

२६. कंत्राटदाराने दरपत्रकातील सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून या नियम, अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र दरपत्रक सादरकर्त्यास दरपत्रक सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

२७. कंत्राटी कामाकरिता नेमलेल्या मजुरांना मद्यपान किंवा धुम्रपान ई. व्यसन नसावे.

२८. नमूद केलेल्या कामाचा ठेका मधेच/अर्धवट सोडून गेल्यास त्या महिन्याच्या कामाची मजुरी/रक्कम मिळणार नाही.

२९. सदर कंत्राटदार संस्था असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्त्याकडे असतील.

३०. प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाच्या मजुरीचे देयक महिना संपल्यावर कार्यालयात सादर करावे लागेल.

३१. केलेल्या कंत्राटी कामची शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.

३२. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराने दरपत्रकातील सर्व नियम, अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु. १००/- च्या stamp paper वर त्वरित करून द्यावा लागेल.

३३. कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम दरपत्रक धारकास सदर कामाचा कंत्राट/ठेका देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

३४. कंत्राटदार यांच्याकडून वरीलपैकी कोणत्याही नियम, अटी व शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करण्यात येईल.

३५. दरपत्रकामधील कंत्राटी कामाचे स्वरूप, लागणारे कंत्राटी मजूर ई. अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# दरपत्रक

**(FORM OF QUOTATION)**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील **'दुग्धशाळेतील जनावरांचे दुध काढणे, देखरेख व स्वच्छता, शेतीमशागतिची कामे करणे, पेरणी करणे, चारा कापणे तसेच कुट्टी करणे, चारा पिकास ओलीत करणे, चौकीदारी करणे, गांडूळखत निर्मिती संबंधी विविध कामे करणे, कुक्कुटपक्षी पालन संबंधी विविध कामे करणे, इत्यादी कामे'** ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेकरिता दर पुरविणेबाबतचे दरपत्रक.

| **Sr. No.** | **Description** | **Skilled contractual labour (Rs.)** | **Semiskilled contractual labour (Rs.)** | **Unskilled contractual labour (Rs.)** | **Unskilled contractual labour (Rs.)** |
|---|---|---|---|---|---|
| | | दुग्धालय (डेअरी) उद्योग | दुग्धालय (डेअरी) उद्योग | दुग्धालय (डेअरी) उद्योग | शेतकी कामधंदा |
| 1. | Basic Wages | | | | |
| 2. | Variable Dearness Alloance | | | | |
| | *Total Minimum Wages* | | | | |
| 3. | EPF 13 % | | | | |
| 4. | ESIS 4 % | | | | |
| 5. | Service Charges or Company/Firm Charges | | | | |
| 6. | *Total Rs.* | | | | |
| 7. | GST (If applicable) | | | | |
| 8. | *Total with GST* | | | | |
| **9.** | **Rate per month per unit for Skilled/Semiskilled/Unskilled (Rs.) 1 Unit** | | | | |

टीप : निविदा सुचणेमधील संपूर्ण अटी व शर्ती बंधनकारक राहील.

ठिकाण :
दिनांक :

कंत्राटदाराचे नाव व स्वाक्षरी